# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 04/06/2021 (शुक्रवार)

(दुपार)

---

### अज्ञात आरोपी कडून शेतीला आग

पो.स्टे.मौदा :– अंतर्गत 20 कि.मी. अंतरावरील सुंदरगाव मौदा येथे दिनांक 03/06/2021 चे 20.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– व्यंकट राजेश कोगंटी, वय 50 वर्ष, रा. सुंदरगाव ता. मौदा जि. नागपुर हा घरी हजर असता राहुल साठवने यांनी कॉल करून सांगीतले की, "तुमच्या शेतात आग लागली आहे." यावरून फिर्यादीने जावुन पाहनी केली असता तनसाच्या ढीगाला आग लागलेली होती व शेतातील घरासमोर उभा असलेला ट्रॅक्टरचे रेंडीयेटर, स्टेरींग, डॅश बोर्ड, मरगार्ड बॉनेट तोडफोड केलेली दिसली. तसेच शेतातील घरात ठेवलेले पॉच कॅन प्रत्येकी 20 लीटर असे एकुण 100 लीटर डीजल कि. 70,000/–रू. चे भरून होते ते संपुर्ण जमीनीवर सांडलेले दिसले. अज्ञात आरोपीने फिर्यादीचे शेती व ट्रॅक्टरचा असा एकुण कि. 70,000/–रू चे नुकसान केले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम 435, 427 भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा देशमुख मो. नं. 9922447045 हे करीत आहे.

### अवैधरीत्या धारदार व घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत 02 कि.मी. अंतरावर हरीहर नगर कांद्री, कन्हान येथे दिनांक 03/06/2021 चे 22.10 वा. ते 22.45 वा. दरम्यान आरोपी नामे– प्रदीप उर्फ गोलु देवानंद, वय 27 वर्ष, रा. काटोल, हरीहर नगर कांद्री कन्हान हा सार्वजनिक ठिकाणी हरीहर चौकात स्वत: जवळ धारधार शस्त्र तलवार गुन्हा करण्याच्या उद्देशाने विनापरवाना अवैधरीत्या हातात घेउन लोकांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण होईल अशा स्थितीत मिळुन आला.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोहवा खुशाल रामटेके, पोस्टे. कन्हान यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम 4, 25 भारतीय हत्यार कायदा सहकलम 135 मपोका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. नमुद आरोपीस सुचनापत्रावर रिहा करण्यात आले असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार रामटेके 8485861442 हे करीत आहेत.


पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर